श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय

दोडी बु।।, ता. सिन्नर, जि. नाशिक. ☎ ०२५५१-२६१८३८

महा.शासन मान्यता क्र. एनजीसी २००३/नमवि/(१/०३)/माशि-३ दि. १५/७/२००३

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न क्रमांक : (ID No.PU/NS/AC/74/2003)

E-Mail-ID=artsandcommercecollege_dodibk@rediff.com

**सूचना फलक - २०२०-२१ समक्ष** **दि. २४/०२/२०२१**

## मराठी विभाग

## (शैक्षणिक वर्ष २०२०-२१)

### -: सूचना :-

### “मराठी भाषा संवर्धन पंधरवडा”

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना मराठी विभागाच्या वतीने सूचित करण्यात येते की, मराठी विभागाच्या वतीने महाविद्यालयात शनिवार, दि. २७/०२/२०२१ ते शनिवार, दि १३/०३/२०२१ या कालावधीत “मराठी भाषा संवर्धन पंधरवडा” निमित्त विविध उपक्रमांसह मराठी विभागाच्यावतीने राबविण्यात येणार आहेत. तरी सदर उप्रक्रमात महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे. तसेच सदर कार्यक्रमांसाठी आपली उपस्थिती अनिवार्य असेल, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

कळावे,

मराठी विभाग प्रमुख

S.B.S.S.P.M. Arts and Commerce College, Dodi Bk.II — Department of Marathi — Tal.- Sinnar, Dist. Nashik

S.B.S.S.P.M. Arts and Commerce Collage — DODI Bk.II — Tal.- Sinnar, Dist. Nashik

प्राचार्य

PRINCIPAL
Arts & Commerce Collage
Dodi Bk. Tal. Sinnar, Dist. Nashik

# मराठी राजभाषा दिन अहवाल -


विद्याथी विकास मंडळ व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कवी वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज जयंती ' त्याचनिमित्ताने 'मराठी राजभाषा दिन' साजरा करण्यात आला . दि. २७ फेब्रुवारी ते १३ मार्च या काळात 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्ताने भव्य व्याख्यान आणि कविसंमेलन, ग्रंथप्रदर्शन आदी उपक्रमांसह ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला. साजरा करण्यात आला. यामध्ये "माझ्या मराठीचे बोलू कौतुके व मराठी भाषाभिमान" या विषयावर युवाव्याख्याते, राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त, साईदीप क्लोचिंग क्लासचे संचालक प्रा. दिपक सीताराम राऊत (अकोले, अहमदनगर) यांनी मराठी भाषेची पूर्वपीठीका सांगत मराठी भाषेचे महत्व विषद केले. त्यानंतर महाराष्ट्रातील प्रसिद्ध युवाकवी श्री. जगदीश पवार यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील नामवंत कवींचे कविसंमेलन घेण्यात आले. या कवीसंमेलांत कासार अक्षय रघुनाथ (अकोले) - 'शेतकरी राजा,' कु. सुजाता दिलीप साबळे (अकोले) - 'निशब्द', कु. ऐश्वर्या नेहे पाटील , (राहुरी) -बहीण', कवी अर्जुन राठोड (बीड) - 'माय', कांतासुत प्रमोद घोरपडे (राहुरी) 'कोणत्या मातीचा बनला बाप ', अमोल नामदेवराव चिने (सिन्नर)- 'माय मराठी', मयुरी वणवे (सिन्नर) - 'माझी मराठी', अमोल नामदेवराव चिणे (सिन्नर) - 'बाप' शंकर शिंदे (पारनेर) - 'तमाशा', कवी नीलकंठ पावसकर (कर्जत) प्रा. निलेश वाकचौरे (अहमदनगर) यांनी ' सरणावरची जिंदगी', इ कवींनी आपापल्या स्वलिखित कवितांचे सदरीकरण केले. मराठी विभाग प्रमुख प्रा. एन. बी. वाकचौरे यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषावैभव व साहित्यसृष्टी व्याख्यानातून उलगडून सागितली. प्रा. प्रशांत उगले यांनी "मराठी भाषाभिमान " या विषयावर व्याख्यान दिले. दि. २७ फेब्रुवारी २०२१ रोजी महाविद्यालयामध्ये मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. वाकचौरे एन. बी. यांनी मराठी भाषेचे महत्व पटवून दिले.

प्रा. एन. बी. वाकचौरे

(मराठी विभाग प्रमुख)

S.B.S.S.P.M. Arts and Commerce Collage DODI Bk.II Tal. - Sinnar, Dist. Nashik

S.B.S.S.P.M. Arts and Commerce Collage, Dodi Bk.II Department of Marathi Tal. - Sinnar, Dist. Nashik



AN Aishwarya Nehe Patil

Akshay Kasar

amol chine

D Divya

JAGDISH LAXMAN PAWAR


OA OPPO A53

P Pawar

Snehal Kulthe

S snehdeep

म मयुरी सुनंदा राधाकिसन



AN Aishwarya Nehe Patil

Akshay Kasar

amol chine

D Divya

JAGDISH LAXMAN PAWAR

OA OPPO A53

P Pawar

Snehal Kulthe

S snehdeep

म मयुरी सुनंदा राधाकिसन

B.S.S.P.M. Arts and Commerce Collage
DODI Bk.II
Tal.- Sinnar, Dist. Nashik

लोकमत

# माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा...

## मराठी भाषा गौरव दिनी जिल्ह्यात विविध उपक्रम : ऑनलाईन व्याख्यान, कविसंमेलन रंगले

S.B.S. Smt. Arts and Commerce College, DODI Bk.II, Tal. - Sinnar, Dist. Nashik

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा, हिच्या संगाने जागल्या दऱ्या-खोऱ्यातील शिळा... असे वर्णन कविश्रेष्ठ कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांनी मराठी भाषेचे महत्त्व सांगताना केले आहे. त्यांचा जन्मदिवस मराठी राजभाषा दिन म्हणून सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

### श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण मंडळ

सिन्नर : तालुक्यातील दोडी येथील श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, दोडी बुद्रुक येथे विदयार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विभाग आयोजित 'कवी कुसुमाग्रज जयंती' तसेच 'मराठी राजभाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला.

मराठी राजभाषा दिन व मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने ऑनलाईन झूम मिटिंगद्वारा 'माझ्या मराठीचे बोलू कौतुके' याविषयावर युवाव्याख्याते प्रा. दीपक सीताराम राऊत यांनी मार्गदर्शन केले. 'मराठी भाषा आजच्या २१व्या शतकात साहित्य, कला, ज्ञानव्यवहार, राज्य कारभार, शिक्षण, संस्कृती यामधून टिकली पाहिजे, तिचे जतन व संवर्धन करणे गरजेचे आहे. मराठी ही आज एक महत्त्वाची ज्ञानभाषा आहे. त्यामुळे तिच्यासाठी एक स्वतंत्र असे खास मराठी विद्यापीठ व्हावे', असे प्रतिपादन प्रा. दीपक राऊत यांनी केले. यावेळी कवी कांतासूत प्रमोद घोरपडे (अहमदनगर) यांनी 'कोणत्या मातीचा बनला बाप', जगदीश पवार (जळगाव) यांनी 'मी आणि ती', अमोल चिने (नाशिक) यांनी 'बाप', शिवव्याख्याते अक्षय कासार (अहमदनगर) यांनी 'शेतकरी राजा', शंकर शिंदे (अहमदनगर) यांनी 'तमाशा', अर्जुन राठोड (बीड) यांनी 'माय', कवयित्री मयुरी वनवे (नाशिक) यांनी 'माझी मराठी', सुजाता साबळे (अहमदनगर) यांनी 'निशब्द', ऐश्वर्या नेहे (अहमदनगर) यांनी 'बहीण', प्रा. नीलेश वाकचौरे (नाशिक) यांनी 'सरणावरची जिंदगी' या शीर्षकाची कविता सादर केली. कवी शंकर शिंदे, जगदीश पवार, प्रमोद घोरपडे यांच्या विविध कवितांना विशेष दाद मिळाली. यावेळी महाविद्यालयातील विदयार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा. एन. बी. वाकचौरे, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. प्रशांत उगले, प्रा. एस. के. बलक, प्रा. राजेंद्र केदार, प्रा. अरूण आव्हाड, प्रा. सोमनाथ आव्हाड, प्रा. राजेंद्र केदार, प्रा. कल्पना घुगे, आदी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एस. बी. भावड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. नीलेश वाकचौरे कवी जगदीश पवार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. प्रशांत उगले यांनी आभार मानले.

### जळगाव नेऊर विद्यालय

जळगाव नेऊर : म. वि. प्र. संचलित, जनता विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमप्रसंगी कविवर्य कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपमुख्याध्यापक जी. एच. कोकाटे, सी. सी. खैरनार, एस. जी. पानसरे, एस. पी. शेळके, सी. एन. आहेर, एस. बी. पाटील, ए. एस. जाधव, एस. जी. बोरनारे, आवणकर उपस्थित होते.

### आत्मा मालिक विद्यालय

जळगाव नेऊर : पुरणगाव येथील आत्मा मालिक इंग्लिश मीडियम गुरुकुल व ज्युनियर कॉलेजमध्ये मराठी गौरव दिन व विज्ञान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमप्रसंगी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज व विज्ञान क्षेत्रातील थोर संशोधक सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी गुरुकुलाचे प्राचार्य राजेश पाटील व मुख्याध्यापक योगेश सोनवणे उपस्थित होते. गुरुकुलाचे अध्यक्ष हनुमंत भोगळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला.

### त्र्यंबकच्या कन्या विद्यालयात कार्यक्रम

त्र्यंबकेश्वर : भारतातील जवळपास २५ टक्के मराठी भाषिक विदेशात आहेत. तेथेही आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठीचा डंका वाजत आहे. यासाठी आपली मातृभाषा मराठीचा आदर करताना न्यायालय तसेच सरकार दरबारी सर्वत्र मराठीकरण होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन नाशिकच्या पुष्पाताई हिरे कन्या विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक भोये यांनी केले. कवि कुसुमाग्रज जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या राजभाषा दिनानिमित्त येथील आदिवासी सेवा समिती संचलित एमआरपीएच कन्या विद्यालयात आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात कुसुमाग्रज यांच्या प्रतिमापूजनाने झाली. भोये यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. त्यानंतर दोन विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठ शिक्षक कदम यांनी मनोगतातून मराठी भाषा दिनाचे महत्त्व स्पष्ट केले तसेच कुसुमाग्रज यांच्या काव्यसंग्रहाबद्दल माहिती दिली. यावेळी काव्यवाचन स्पर्धा आयोजित केली होती. शिक्षिका आहेर तसेच गांगुर्डे यांनी काव्यवाचन स्पर्धेत प्रथम आलेल्या विद्यार्थिनींची नावे जाहीर केली. सूत्रसंचालन बच्छाव यांनी केले. आभार सोनवणे यांनी मानले. यावेळी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### शाह विद्यालय

मालेगाव : येथील वर्धमान शिक्षण संस्था संचालित श्री र.वी. शाह विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. कोविड पार्श्वभूमीवर ऑनलाइन व ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतीने हा दिवस साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी श्री व्ही.पी. आर्वीकर होत्या.


गांवकरी | जिल्हा विशेष | नाशिक, मंगळवार, दि. २ मार्च, २०२१

# दोडी येथील महाविद्यालयात राजभाषा गौरव दिन साजरा

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील दोडी येथील श्री ब्रह्मानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विभाग आयोजित कवी वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज जयंती तसेच मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. राजभाषा दिन गौरव दिनानिमित्त ऑनलाइन मीटिंग द्वारा माझ्या मराठीची बोलू कौतुके या विषयावर ती सुप्रसिद्ध आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त व युवा व्याख्याते प्राध्यापक दीपक राऊत यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी निलेश वाकचौरे, राष्ट्रीय विकास योजना अधिकारी प्रा. प्रशांत उगले, प्रा. सोमनाथ आव्हाड, प्रा.राजेंद्र केदार, कल्पना घुगे आदीसह शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य एस बी भावड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. निलेश वाकचौरे व कवी जगदीश पवार यांनी केले तर आभार प्रशांत उगले यांनी मानले.

S.B.S.S.P.M. Arts and Commerce Collage
DODI Bk.II
Tal. - Sinnar, Dist. Nashik




S.B.S.S.P.M. Arts and Commerce Collage
DODI Bk.II
Tal. - Sinnar, Dist. Nashik
S.B.S.S.P.M. Arts and Commerce Collage
DODI Bk.II
Tal. - Sinnar, Dist. Nashik

पुढारी

S.B.S.S.P.M. Arts and Commerce College DODI Bk.II Tal. - Sinnar, Dist. Nashik

S.B.S.S.P.M. Arts and Commerce College DODI Bk.II Tal. - Sinnar, Dist. Nashik

# दोडी महाविद्यालयात ऑनलाइन व्याख्यान व कविसंमेलन

**सिन्नर : पुढारी वृत्तसेवा**

दोडी बुद्रुक येथील श्री ब्रह्मानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने कवी वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज जयंती तसेच मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.

मराठी राजभाषा दिन व मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने ऑनलाइन झूम मिटिंगद्वारे 'माझ्या मराठीचे बोलू कौतुके' या विषयावर युवा व्याख्याते प्रा. दीपक राऊत यांनी मार्गदर्शन केले. युवा कवी जगदीश पवार यांच्या मार्गदर्शनाने ऑनलाइन कविसंमेलनही घेण्यात आले.

कवी कांतासुत प्रमोद घोरपडे (अहमदनगर) यांनी 'कोणत्या मातीचा बनला बाप', जगदीश पवार (जळगाव) यांनी 'मी आणि ती', अमोल चिने (नाशिक) यांनी 'बाप', शिवव्याख्याते अक्षय कासार (नगर) यांनी शेतकरी 'राजा', शंकर शिंदे (नगर) यांनी 'तमाशा', 'अर्जुन राठोड (बीड) यांनी 'माय', कवयित्री मयूरी वनवे (नाशिक) यांनी 'माझी मराठी', सुजाता साबळे (नगर) यांनी 'निशब्द', ऐश्वर्या नेहे (नगर) यांनी 'बहिण', प्रा. नीलेश वाकचौरे (नाशिक) यांनी 'सरणावरची जिंदगी' आदी कविता सादर केल्या. प्रभारी प्राचार्य एस. बी. भाबड यांनी प्रास्ताविक तर कविसंमेलनाचे सूत्रसंचालन प्रा. नीलेश वाकचौरे यांनी केले.

My Nashik Edition
Mar 2, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

Yogita

# दोडी येथील महाविद्यालयात राजभाषा गौरव दिन साजरा

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील दोडी येथील श्री ब्रह्मानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विभाग आयोजित कवी वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज जयंती तसेच मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. राजभाषा दिन गौरव दिनानिमित्त ऑनलाइन मीटिंग द्वारा माझ्या मराठीची बोलू कौतुके या विषयावर ती सुप्रसिद्ध आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त व युवा व्याख्याते प्राध्यापक दीपक राऊत यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी निलेश वाकचौरे, राष्ट्रीय विकास योजना अधिकारी प्रा. प्रशांत उगले, प्रा. सोमनाथ आव्हाड, प्रा.राजेंद्र केदार, कल्पना घुगे आदींसह शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य एस बी भावड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. निलेश वाक चौरे व कवी जगदीश पवार यांनी केले तर आभार प्रशांत उगले यांनी मानले.

# यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा आज ऑनलाइन दीक्षांत सोहळा

**नाशिक : प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा २६ वा दीक्षांत समारंभ आज दि. २) ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आला असून, अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा कुलपती भगत सिंह कोश्यारी आणि प्रमुख पाहुणे म्हणून उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती कुलगुरू प्रा. इ वायूनंदन व कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांनी दिली. कोवीडच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन पद्धतीने होणारा हा पहिलाच दीक्षांत सोहळा असणार आहे. या सोहळ्यात २०१९ व २०२० या दोन वर्षात पदवी प्राप्त केलेल्या स्नातकांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे. स्नातकांनी या सोहळ्यात www.ycmou.ac.in या वेबसाइटवरून सहभागी व्हावे, असे आवाहन परीक्षा नियंत्रक शशिकांत ठाकरे यांनी केले आहे.

गांवकरी®
(गांवकरी प्रकाशनचे प्रकाशन)
संस्थापक संपादक : स्व.
संपादक, मुद्रक, प्रकाशक :

S.B.S.S.P.M. Arts and Commerce Collage
DODI Bk.II
Tal. - Sinnar, Dist. Nashik